**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार, दिनांक २५ एप्रिल २०२४**

**ठळक बातम्या**

- **दुसऱ्या टप्प्यातील मतदानासाठी यंत्रणा सज्ज! मतदारांनी सक्रिय सहभाग घेत मतदानाचा टक्का वाढवावा - मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांचं आवाहन.**
- **दुसऱ्या टप्प्याच्या निवडणुकीसाठी राबविण्यात आलेल्या गृहमतदानाच्या प्रक्रियेमध्ये बुलढाणा जिल्हा ठरला अव्वल.**
- **२७ ते २९ एप्रिल दरम्यान नागपूरच्या वनामती इथं बिजोत्सव समुहाद्वारे राष्ट्रीय बीज महोत्सवाचं आयोजन.**
- **६०व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांच्या प्रवेशिका सादर करण्यासाठी ३१ मे पर्यंत मुदतवाढ.**

*****

**एस.चोक्कलिंगम**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात 26 एप्रिल रोजी संपूर्ण देशात तसंच दिल्लीला लागून असलेल्या गाझियाबादमध्ये मतदान होत आहे. त्यासाठीची सर्व तयारी प्रशासकीय पातळीवर पूर्ण झाली असून गाझियाबादमध्ये सर्वाधिक मतदानाची टक्केवारी सुनिश्चित करण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांना सोशल मीडिया आणि इतर माध्यमांद्वारे प्रोत्साहित केलं जात आहे. जिल्हा निवडणूक अधिकारी इंदर विक्रम सिंह यांनी जाहीर केलं आहे की, कोणत्याही मतदान केंद्रावर मागील मतदानापेक्षा दहा टक्के जास्त मतदान झाल्यास संबंधित क्षेत्राचा आर.डब्ल्यू.ए. सन्मान करण्यात येईल. हर्ष रुग्णालयाचे अध्यक्ष डॉ.ब्रिजपाल त्यागी यांनी जनतेला जास्तीत जास्त मतदान करण्याचं आवाहन केलं असून त्यांचा सन्मान करण्याचं जाहीर केलं आहे.

**मतदान तय्यारी**

उद्या 26 एप्रिल रोजी दुसऱ्या टप्प्यातला मतदान प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. अकोला लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीची तयारी पूर्ण झाली असून, मतदानासाठीच्या साहित्याचं वाटप आज सकाळपासूनच सुरू करण्यात आलं आहे. अकोल्यात उद्या होणाऱ्या मतदान प्रक्रियेसाठी अकोला लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदारसंघाच्या ठिकाणाहून नियुक्त करण्यात आलेली मतदान पथकं नेमून दिलेल्या मतदान केंद्रांवर रवाना व्हायला सुरुवात झालीय. अकोला जिल्हयातील 882 ठिकाणी असलेल्या एक हजार 719 मतदान केंद्रांसाठी तब्बल पाच हजारपेक्षा अधिक पोलिस अधिकारी, कर्मचारी तैनात असणार आहेत. यात 'BSF, RPF, CISF केरला फोर्स'च्या तुकड्यादेखील तैनात आहे. राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय सीमांतर्गत, 17 स्थिर सर्वेक्षण पथके, 24 भरारी सर्वेक्षण पथके आणि दोन शीघ्रकृती पथके देखील कार्यरत असणार आहे. मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी वाशिम जिल्हा प्रशासन सज्ज झाल असून, निवडणूक प्रक्रियेत ७ हजार ७१९ अधिकारी आणि कर्मचारी यांच्या नियुक्ती करण्यात आलेल्या आहेत. वाशीम जिल्हयात एकूण ९ लाख ७९ हजार २३७ मतदार असून, आपल्या मतदानाचा हक्क उद्या सकाळी सात वाजता पासून ते बजावणार आहेत. तर यवतमाळमध्ये सुद्धा लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील मतदानाची तयारी ही अंतिम टप्प्यात आली आहे. यवतमाळ वाशीम मतदारसंघात एकूण 19 लाख 40 हजार 916 मतदार असून त्याकरिता 2,225 मतदान केंद्र निर्माण करण्यात आले आहेत. यातील 2 मतदान केंद्र संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आली आहे. महिला कर्मचाऱ्याद्वारे संचालित मतदान केंद्र, दिव्यांग मतदारांसाठी, यूवांसाठी, आणि आदर्श अशी प्रत्येकी 6 मतदान केंद्र निर्माण करण्यात आली आहेत. पोलिंग कर्मचाऱ्यांसाठी 533 वाहनांची व्यवस्था आहे तर, 3,289 पोलीस कर्मचारी देखील तैनात आहेत. आज सकाळपासून मतदानाचं साहित्य वाटप सुरू झालं असून, यासाठी जिल्हा निवडणूक यंत्रणा पूर्णपणे सज्ज झाली आहे.

**वर्धा मतदार संघ**

वर्धा लोकसभा मतदार संघात दुसऱ्या टप्यातील मतदान उद्या सकाळी सात ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत होणार आहे. मतदान सुरक्षित आणि शांततेत पार पाडण्याकरिता प्रशासनामार्फत सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या असून, वर्धा जिल्हा प्रशासन निवडणुकीसाठी सज्ज झालं आहे. सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मतदारांनी मोठ्या संख्येनं मतदान करुन मतदानाचा हक्क बजावावा, असं आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केलं आहे. वर्धा लोकसभा मतदार संघासाठी १६ लाख ८२ हजार ७७१ मतदार, मतदानाचा हक्क बजावणार आहे. त्यामध्ये ८ लाख ५८ हजार ४३९ पुरूष तर ८ लाख २४ हजार ३१८ महिलांचा समावेश असून १४ तृतीयपंथींयांचा समावेश आहे. दिव्यांग मतदार ११ हजार ७८६ असून ८० वर्षावरील मतदारांची संख्या २५ हजार २२ आहे. तसेच सर्व्हीस मतदारांची संख्या १ हजार ५२१ आहे, अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिली.

**गृहमतदान**

दुसऱ्या टप्प्यात तीन दिवस राबविण्यात आलेल्या गृहमतदानाच्या प्रक्रियेमध्ये बुलढाणा जिल्हा अव्वल ठरला आहे. निवडणूक आयोगानं राबविलेल्या मतदान प्रक्रियेमध्ये जिल्ह्यातील ६९२ दिव्यांग आणि २ हजार १७१ अशा एकूण २८३३ नागरिकांनी गृह मतदानासाठी नोंदणी केली होती. यात ६९२ दिव्यांगापैकी ६७२ इतक्या दिव्यांगानी गृह मतदान केलं आणि हि टक्केवारी ९७.१० इतकी असून ८५ वर्षांवरील २,१७१ जेष्ठ नागरिकांपैकी १,९६४ इतक्या मतदारांनी मतदान केलं. याची टक्केवारी ९०.४६ इतकी आहे.

**आत्मा बीजोत्सव**

नागपुरात २७ एप्रिल, ते २९ एप्रिल, या कालावधीत, वनामती, नागपूर इथं बिजोत्सव समुहाद्वारे राष्ट्रीय बीज महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. शेतक-यांना स्वदेशी बियाणांचे संवर्धन करण्यासाठी आणि त्याचा प्रचार करण्यासाठी प्रोत्साहीत करण्यासाठी हा उत्सव २०१३ पासून दरवर्षी आयोजित करण्यात येतो. कृषि उत्पादक शेतकरी, बियाणे संवर्धक शेतकरी आणि कृषि

व्यावसायिकांचा समूह यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात येत असलेल्या या मोहत्सवाचं उदघाटन २७ एप्रिल रोजी सकाळी ११. वाजता कै.वसंतराव नाईक स्मृति सभागृह वनामती, नागपूर इथं होणार आहे. यावर्षी या बीजोत्सव चळवळीमध्ये वनामती संस्था, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (ATMA), प्रामुख्यानं सहभागी होत आहे. दरवर्षी बीजोत्सवात सुमारे २०-२२ राज्यांतील शेतकरी, बियाणे संवर्धन करणारे शेतकरी तसेच संस्था आपआपल्या बिजांची विविधता, शेतमाल, साहित्य आणि आपले ज्ञान यांची देवाणघेवाण करतात. तीन दिवसांच्या या कार्यक्रमात सरासरी १५ ते २० हजार अभ्यागत भेट देतात. २०१३ पासून बीजोत्सवानं सुरक्षित पोषक अन्न, शाश्वत शेतीचं तंत्र आणि देशी बियाणांच्या जातींचं जतन तथा प्रसार यासाठी एक व्यासपीठ तयार केलं आहे.

**राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांच्या प्रवेशिका**

६०व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांच्या प्रवेशिका सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. आता ३१ मे २०२४ पर्यंत प्रवेशिका सादर करता येणार आहेत. त्यामुळं निर्मात्यांनी सन २०२२ या कॅलेंडर वर्षात सेन्सॉर प्राप्त झालेल्या मराठी चित्रपटांच्या प्रवेशिका दिलेल्या विहित मुदतीत सादर करण्याचं आवाहन, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी केलं आहे. राज्य शासनाच्या वतीनं या पुरस्कारासाठी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळातर्फे प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. महामंडळाच्या दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव पूर्व, मुंबई-६५ इथल्या जनसंपर्क विभागात कार्यालयीन वेळेत त्याचबरोबर www.filmcitymumbai.org या संकेतस्थळावर देखील सविस्तर माहिती उपलब्ध आहे.

**विजयलक्ष्मी बिदरी**

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमा अतंर्गत घडलेल्या प्रत्येक घटनेची नोंद घेवून त्यानुसार तात्काळ तपास पूर्ण करण्याला प्राधान्य देण्यात येवून विभागात विविध स्तरावरील पिडीत व्यक्तीला तात्काळ मदत देण्याच्या सुचना विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी

आज दिल्या. विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय दक्षता आणि नियत्रंण समितीची बैठक विजयलक्ष्मी बिदरी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यातंर्गत एप्रिल पासुन विभागात ३३४ गुन्हयांची नोंद झाली असून यामधील २५७ प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत. न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांच्या निकालासंदर्भात जिल्हा शासकीय अभियोक्ता मार्फत गती द्यावी, अशी सूचना विभागीय आयुक्तांनी बैठकीत दिली आहे.

**महावितरण**

वीज वाहिन्या, वितरण रोहीत्र, फीडर पीलर किंवा वितरण पेट्यांजवळ कचरा जाळण्याच्या प्रकारामूळे वीजयंत्रणेला धोका निर्माण होऊन सर्वसामान्य नागरिकांसोबतच विज वितरण कंपनीला नाहक मन:स्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे वीजयंत्रणेजवळ कचरा टाकू नये आणि त्यास जाळूही नये असं आवाहन महावितरणकडून करण्यात आलं आहे. अशा घटनांतून वीज यंत्रणेला आग लागल्याचं आढळल्यास 1912 किंवा 19120, 1800-212-3435 आणि 1800-233-3435 या टोल फ्री क्रमांकांवर किंवा नजिकच्या महावितरण कार्यालयाला त्याची सुचना दिली जाऊ शकते.

**हवामान**

नागपूरसह विदर्भाच्या सर्व जिल्हयांमध्ये आज वादळी वाऱ्यासह तुरळक ठिकाणी पर्जन्यवृष्टी होऊ शकते तर उद्या पूर्व विदर्भातील वर्धा, भंडारा आणि संपूर्ण पश्चिम विदर्भ अर्थात अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशीम, आणि बुलढाणा याठिकाणी वादळी पर्जन्यमान राहील असा इशारा हवामान विभागानं दिला आहे. दरम्यान विदर्भात आज सर्वाधिक तापमानाची नोंद वाशिम जिल्हयात 40 पूर्णांक 6 अंश सेल्सियस इतकी करण्यात आली.

IIT-JEE दुसऱ्या टप्प्याचा निकाल जाहीर

IIT-JEE मुख्य परीक्षेच्या दुसऱ्या टप्प्याचा निकाल जाहीर झाला आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीनं काल रात्री हा निकाल जाहीर केला. यात नागपूरचा विद्यार्थी

नीलकृष्ण निर्मलकुमार गाजरे हा १०० टक्के गुणांसह अव्वल ठरला आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सी नं (NTA) जानेवारी आणि एप्रिल सत्रासाठी पेपर एक BE आणि B.Tech साठीचा एकत्रित निकाल जाहीर केला आहे. यामध्ये 56 उमेदवारांना 100 टक्के गुण मिळाले आहेत. IIT प्रवेश परीक्षेत 2 लाख 50 हजार 284 विद्यार्थी JEE Advanced मध्ये यशस्वी झाले आहेत.

**निवडणूक रोखे**

निवडणूक रोखे प्रकरण हा मोठा घोटाळा असून त्याची विशेष तपास पथक एस आय टी मार्फत चौकशी केली जावी, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. कॉमन कॉज आणि सेंटर फॉर पब्लिक इंटरेस्ट लिटिगेशन या संस्थांनी ही याचिका दाखल केली आहे.

******